आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

४ जुलै २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

- केंद्र सरकारकडून कांद्याच्या दरात २ हजार १२५ रुपये क्विंटलपर्यंत वाढ

- पश्चिम आशियातल्या संकटाच्या काळात केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळं इंधन दरवाढ आटोक्यात राहिल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- टीईटी पेपरफुटी प्रकरणी आग्रातल्या छापखान्याच्या तीन कर्मचाऱ्यांना अटक

**आणि**

- पावसामुळं राज्याच्या अनेक भागात जनजीवन विस्कळीत, मुंबई, पालघर, ठाणे आणि पुणे-साताऱ्याच्या घाट परिसरात रेड अलर्ट

**<><><><><>**

केंद्र सरकारने कांद्याचा खरेदी दर १३ टक्क्यांनी वाढवला आहे. हा दर १ हजार ८७५ रुपये प्रति क्विंटलवरून २ हजार १२५ रुपये प्रति क्विंटल केला आहे. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने ही माहिती दिली. सुधारित खरेदी दर आजपासून लागू झाला आहे. सरकारच्या किंमत स्थिरीकरण धोरणाअंतर्गत 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ' यांच्यामार्फत कांद्याची खरेदी सध्या सुरू आहे.

कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाच्या २०२५-२६ च्या दुसऱ्या आगाऊ अंदाजानुसार, कांद्याचं उत्पादन ३०७ लाख मेट्रिक टनांहून अधिक होण्याचा अंदाज आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये सध्या पुरेसा साठा असून, कांद्याच्या तुटवड्याची कोणतीही चिन्हं सध्या दिसत नाहीत, असंही मंत्रालयाने सांगितलं.

**<><><><><>**

राज्यातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ व इतर प्रतिकूल परिस्थितीमुळे होणाऱ्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळावं, या उद्देशाने राज्य शासनाने २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू केली आहे. खरीप हंगामासाठी भात, ज्वारी, बाजरी, नाचणी,, मूग, उडीद, तूर, मका, भुईमूग, तीळ, कारळं, सोयाबीन, कापूस आणि खरीप कांदा या एकूण १४ पिकांचा योजनेत समावेश

करण्यात आला आहे. ३१ जुलैपूर्वी शेतकऱ्यांनी नोंदणी करावी, असं आवाहन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केलं.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या दिवसात जगात सर्वत्र इंधनपुरवठ्याचा पेच उद्भवला परंतु समयोचित निर्णय, प्रभावी मुत्सद्देगिरी आणि देशाच्या साधनसंपत्तीचं उचित व्यवस्थापन याच्या जोरावर या संकटातून देशानं वाट काढली असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राजस्थानात बलोत्रा इथं तेलशुद्धिकरण आणि पेट्रोरासायनिक संकुलाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. भारताचे जगात सर्वांशी मैत्रीपूर्ण संबंध असल्यानं, पूर्वी २५ -२६ देशांकडून इंधन आयात केलं जात असे, ते आता ४० देशांकडून येऊ लागलं असं ते म्हणाले.

देशात इंधनाचे दर आटोक्यात ठेवण्यासाठी सरकारने उपाययोजना केल्या त्यामुळे एलपीजी सिलिंडरचे दर ९०० रुपये पर्यंत राहिले, अन्यथा ते दोन हजार प्रतिसिलिंडरपर्यंत कडाडले असते असं मोदी म्हणाले. केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळं खतांच्या किंमती आटोक्यात राहिल्याचंही ते म्हणाले.

**होल्ड- बाईट- प्रधानमंत्री**

**<><><><><>**

सखोल चाचण्यांनंतर वाहनांसाठी २० टक्के इथेनॉल मिश्रित इंधन वापरात आणले आहे. त्यामुळं वाहनधारकांनी याविषयी कोणतीही शंका मनात बाळगू नये असं आवाहन पेट्रोलियम तज्ञ आणि वाहन उद्योगानं केलं आहे. यासंदर्भात देशभरात विविध ठिकाणी वार्ताहर परिषद घेऊन नागरिकांचे संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न आज त्यांनी केला. या इंधनाचा वापर केल्यानं वाहनांच्या मायलेजमध्ये फारसा फरक पडत नाही. तसंच देखभालीचा खर्चही वाढत नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. ई-20 इंधनासाठी तयार करण्यात आलेली वाहने सुमारे ४० ते ६० हजार किलोमीटरपर्यंत प्रयोगशाळेत आणि प्रत्यक्ष रस्त्यावर चाचणी केल्यानंतर वापरात आणली जातात असं ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडियाचे संचालक डॉ. रेजी माथाई म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचा बंद झालेला निधी पुन्हा सुरु करण्याबाबत येत्या महिन्याभरात निर्णय घेऊ असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिलं.

आंतरराष्ट्रीय सहकारदिनानिमित्त आयोजित सहकार गौरव पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. मुंबई व्यतिरिक्त इतर भागातल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना स्वयंपुनर्विकासाच्या प्रक्रियेत घेउन येऊ असं आश्वासनही त्यांनी यावेळी दिलं.

**होल्ड बाईट-मुख्यमंत्री**

**<><><><><>**

टीईटी पेपरफुटीच्या प्रकरणात पोलिसांनी आणखी ३ जणांना अटक केली आहे. हे तिघे परीक्षेचा पेपर छापण्यात आलेल्या आग्र्यातल्या छापखान्याचे कर्मचारी आहेत. या आरोपींना भिवंडीतल्या न्यायालयानं ९ जुलै पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात आतापर्यंत एकूण १० जणांना अटक झाली आहे.

**<><><><><>**

सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण संस्थेने आज २३१ कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या बँक फसवणुकीशी संबंधित प्रकरणात महाराष्ट्र आणि गुजरात मधल्या अनेक ठिकाणी शोध मोहीम राबवली. स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई आणि कॅनरा बँकेच्या तक्रारीवरून 'आर एल ज्वेल्स लिमिटेड', तिचं संचालक आणि अज्ञात सरकारी अधिकारी आणि 'आशापुरा गारमेंट्स लिमिटेड', तिचे संचालक आणि अज्ञात खाजगी व्यक्ती यांच्या विरोधात एक गुन्हा दाखल करण्यात आला.

**<><><><><>**

पावसामुळं आज राज्याच्या अनेक भागात जनजीवन विस्कळीत झालं. याविषयी अधिक जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून..

**होल्ड व्हाइस कास्ट**

***(मुंबई शहर*** *आणि उपनगरांमध्ये आज जोरदार पावसाच्या सरी कोसळल्या. मुंबईत सकाळी साडे आठ ते दुपारी अडीच यावेळेत सर्वाधिक पाऊस विक्रोळीत १६४ मिलीमीटर तर सर्वात कमी भायखळ्यात साडे चौतीस मिलीमीटर पाऊस झाला. या पावसामुळं आज मुंबई, ठाणे, पालघरमध्ये शाळांना सुटी जाहीर झाली होती.*

***पालघर*** *जिल्ह्यात अनेक ठिकाणी पूरसदृश स्थिती निर्माण झाली असून रस्ते, पूल आणि रेल्वे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. पालघर आणि नालासोपारा रेल्वे स्थानकात रेल्वे*

*रुळांवर पाणी आल्याने रेल्वे सेवेवर परिणाम झाला आहे. तर पालघर जिल्हा आणि सत्र न्यायालय परिसर जलमय झाला आहे.*

***रायगड*** *जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस कोसळत असल्यानं सावित्री, कुंडलिका ,अंबा, पाताळगंगा, उल्हास, गाढी या महत्वाच्या नद्या दुथडी भरून वहात आहेत. महाड बस स्थानकात फुटभर पाणी साचलं आहे.*

***कोल्हापूर*** *जिल्ह्यात गेल्या ४ दिवसांपासून बरसणाऱ्या पावसामुळे पंचगंगा, भोगावती, उभी, कासारी आणि दूधगंगा नद्यांच्या पाणी पातळीत कमालीची वाढ झाली आहे. पंचगंगा नदीची पाणी पातळी २४ फुटांवर पोहोचली आहे*

***जालना*** *शहरासह जिल्ह्यात आज सकाळपासून पावसाची संततधार सुरू आहे. या पावसामुळे खरिपातल्या पिकांना आधार मिळाला आहे.*

***अकोल्यात*** *रिमझिम पाऊस सुरु आहे.*

***कोकण*** *विभागात होत असलेल्या मुसळधार पावसामुळे विभागातल्या प्रमुख जलप्रकल्पातल्या पाणीसाठ्यात समाधानकारक वाढ झाली आहे. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या धरणात पाण्याचा साठा वाढत असून, यामुळे नागरिकांची आणि शेतकऱ्यांची पाण्याची चिंता मिटली आहे. धोक्याच्या पातळीपर्यंत पोहचत असलेल्या पाणीसाठ्यावर संबंधित पूर नियंत्रण कक्ष लक्ष ठेवून आहेत.)*

**<><><><><>**

पालघर, ठाणे, मुंबई या जिल्ह्यांना तसंच पुणे आणि सातारा जिल्ह्यातल्या घाटमाथ्यावरच्या भागासाठी हवामान विभागानं येत्या २ दिवसांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. तर याच काळात रायगड, रत्नागिरी आणि नाशिक जिल्ह्याच्या घाटमाथ्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**<><><><><>**

संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या २० जुलै ते १३ ऑगस्ट दरम्यान होणार आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी समाजमाध्यमावरून ही माहिती दिली.

**<><><><><>**

भारत आणि इंग्लंड मध्ये होत असलेल्या दुसऱ्या टी - २० सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या

पहिल्या षटकांत बिन बाद ४ धावा झाल्या होत्या.  यासंघात वैभव सुर्यवंशीला स्थान मिळालं आहे. १५ वर्ष आणि ९९ दिवसाचा असताना त्याचा भारतीय संघात समावेश झाला. त्यानं सचिन तेंडुलकरचा कमी वयात भारतीय संघात स्थान मिळवण्याचा विक्रम मोडला आहे.

**<><><><><>**

रायगड जिल्ह्यात पर्यटनाला चालना देणारे बहुप्रतीक्षित पाच रोपवे प्रकल्पांना राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. यामध्ये रायगड पायथा ते रायगड किल्ला, अलिबाग किनारा ते कुलाबा किल्ला, नेरळ ते माथेरान, कनकेश्वर डोंगर आणि एलिफंटा केव्हज इथं हे रोपवे होणार आहेत.

**//<><><><><>//**